International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 12 No.3 Jan-Feb 2025

# महाराष्ट्रातील संतांचे सामाजिक योगदान

**डॉ. राजश्री पराग देशपांडे**
M.A., M.Ed., Ph.D. ( मराठी ) सहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग, फर्ग्युसन कॉलेज,पुणे.
**Corresponding Author: डॉ. राजश्री पराग देशपांडे**
**DOI- 10.5281/zenodo.17007990**

**सारांश**

महाराष्ट्रातील संतांनी समाजाच्या इतिहासात अत्यंत मोलाचे योगदान दिले आहे. संत ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम, चोखामेळा, जनाबाई, मुक्ताबाई, रामदास स्वामी आदी संतांनी आपल्या अभंग, ओवी, आरत्या व ग्रंथरचनांद्वारे समाजप्रबोधनाचे कार्य केले. त्यांनी अंधश्रद्धा, जातिभेद, अस्पृश्यता, उच्चनीचता याविरुद्ध आवाज उठवला आणि समानता, बंधुता, त्याग, सहिष्णुता, मानवता व अध्यात्मिकतेचा संदेश दिला. वारकरी संप्रदायाच्या माध्यमातून त्यांनी भक्तीला सामाजिक सुधारणा आणि लोकजागृतीचे साधन बनवले. स्त्रीसंतांनी आपल्या साहित्यामध्ये स्त्रियांच्या दुःख, अन्याय आणि सामाजिक प्रश्नांना वाचा फोडली. समर्थ रामदासांनी प्रपंच आणि परमार्थ यांचा समन्वय साधून समाजाला प्रेरणा दिली. या संतांच्या वाङ्मयामुळे महाराष्ट्रातील समाज अधिक प्रगत, विज्ञाननिष्ठ व मानवतावादी दृष्टिकोनाकडे वाटचाल करू लागला. आजही त्यांचे विचार समाजाला दिशा व प्रेरणा देणारे आहेत.

**मुख्यशब्द-**संत साहित्य,वारकरी संप्रदाय,समाजप्रबोधन,समानता व बंधुता,स्त्रीसंतांचे योगदान,मानवतावाद,भक्ती चळवळ, सामाजिक सुधारणा.

**प्रस्तावना**

सुमारे आठशे ते नऊशे वर्षापूर्वी म्हणजेच ज्ञानेश्वर पूर्वकाळामध्ये मुकुंदराज व चक्रधर संप्रदायातील संतांचे सामाजिक कार्य महत्त्वाचे आहे. भारतामध्ये नाथ संप्रदायाचे कार्य मुकुंदराज पूर्वकाळामध्ये चालू होते. तसेच गोरक्षनाथांची परंपरा, संत ज्ञानेश्वर व त्यांनी स्थापन केलेला वारकरी संप्रदायातील संतांच्या माध्यमातून अविरतपणे चालू आहे. महाराष्ट्रातील संत हे समाजाच्या इतिहासातील अत्यंत प्रभावी आणि आदरणीय व्यक्तिमत्व आहेत. त्यांनी केवळ जागृती केली नाही, तर समाज सुधारणा समता, आणि सहिष्णूतेच्या मूल्यांचा प्रसार केला. या संत संप्रदायाने सामाजिक, अध्यात्मिक आणि सांस्कृतिक सुधारणांचा मोठा वाटा उचलला. महाराष्ट्रातील संतांनी आपल्या साहित्यातून समाज प्रबोधनाचे मोठे कार्य केले. त्यांचे निवडक अभंग व त्यांचे कार्य यांच्या माध्यमातून सामाजिक योगदान दिले. त्यांचे कार्य आणि विचार समाजात एक नवी दिशा देतात.

महाराष्ट्रातील संतांनी समाज घडवला. आपण ज्ञानेश्वर कालीन म्हणजेच इ.स. १२७५ ते १२९६ समाज व्यवस्था पाहिली असता लोक भूत, भविष्य, मारण यंत्र यात रस होत होती. ज्योतिष विद्येमध्ये प्रविण अशी माणसे त्याकाळच्या समाजात खूप होती. शिल्पकला, पाककला, संगीत, वैद्यकशास्त्र याचे ज्ञान असणारी माणसेही समाजात होती पण त्यांना स्वतंत्र दृष्टी नव्हती. १२व्या शतकापासून १७ व्या शतकापर्यंत अनेक सन् मंडळीनी आपल्या साहित्यातून समाज घडवण्याचा प्रयत्न केला समाजाला योग्य दिशा देणे वाट चुकलेल्याला योग्य मार्गदर्शन करणे अंधश्रध्दा अनिष्ठ रूढी, परंपरा, देवधर्म, भोळेपणा सोडून विज्ञानवादी दृष्टीकोन निर्माण करणे. गरीब व दुबळया समाजाबद्दल या संतांना तळमळ वाटते. संतांनी आपल्या साहित्यातून समाजाला समानतेची, त्यागाची, बंधुभावाची, एकतेची शिकवण दिली. अशा वारकरी संप्रदायात संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत एकनाथ, संत तुकाराम, संत चोखामेळा, संत नरहरी सोनार, संत जनाबाई, संत मुक्ताबाई, संत सोयराबाई, संत कान्होपात्रा, संत बहीणाबाई, संत रामदास स्वामी, इत्यादी संत मंडळीनी समाज उद्धारासाठी आपल्या साहित्यातून मौलिक विचारांचे योगदान दिले आहे. त्यांनी आपल्या अभंगातून व साहित्यातून सामाजिक योगदान दिले.

संत ज्ञानेश्वरांनी दहाव्या अध्यायात अडाणी, निरक्षर, धर्मभोळा व दिशाहिन झालेल्या समाजाला योग्य दिशा दिली. याविषयी ल. रा. नसिराबादकर म्हणतात, "काम, क्रोध, मोह, लोभ, यांच्या आधिन झालेली सामान्य

माणसे सत्व, शांती, विवेक, वैराग्य, अध्यात्मिक समाधान या गुणांना पारखी होत आहेत हे ज्ञानदेवांनी पाहिले. अशा स्थितीत या अज्ञानी लोकांना मार्गदर्शन करावयाचे असेल, वैदिक धर्माची ओहोटी थांबवायची असेल, तर या भोळयाभाबड्या लोकांना अध्यात्मविचारांची ठाम बैठक मिळवून देण्याशिवाय पर्याय नाही. सर्वसामान्य समाजाच्या उध्दारासाठी आपला विचार सर्वसामान्यांपर्यंत पोहचविल्यासाठी ***'सुबोध'*** अशा मराठी भाषेत ज्ञानेश्वरीची रचना केली. ज्ञानदेवाचे हे सामाजिक कार्य साहित्यिक व सांस्कृतिक दृष्ट्या मोलाचे आहे. म्हणून तेराव्या शतकातील महाराष्ट्रीय सांस्कृतिक जीवनाचे व व संपूर्ण मराठी साहित्याचे ते आद्य प्रवर्तक ठरतात.

संतांच्या कार्याचा आरंभ संत ज्ञानेश्वरांपासून झालेल दिसतो. संत ज्ञानेश्वर पूर्वकाळात महाराष्ट्रामध्ये चक्रधर स्वामींचे तत्त्वज्ञान जनमानसात रुजले होते. समाजातील पंडीत, स्पृश्य-अस्पृश्य व स्त्रीयांनी महानुभाव पंथाचा स्विकार केला होता. पण पुढे या महानुभाव पंथाला उतरती कळा लागली. त्यानंतर समाजाला योग्य दिशा देण्याचे काम संत ज्ञानेश्वरांनी केले. संत ज्ञानेश्वरांनी संस्कृतमधील भगवतगीतेच्या ७०० श्लोकांवर आधारित ***भावार्थ दिपिका*** हे काव्य शके १२१२ (इ.स. १२९०) ला प्राकृतमध्ये लिहीले. याच बरोबर *चांगदेव पासष्टी*, *अमृतानुभव* यासारखे रसाळ ग्रंथ लिहीले. विराण्या, गौळणी व अभंगातून अद्वैत तत्त्वज्ञान सांगितले.

संत ज्ञानेश्वर म्हणतात ...
अवघाचि संसार सुखाचा करीन।
आनंदे भरीन तिन्ही लोक ।।

संत ज्ञानेश्वरांनी विठ्ठलाला आपले देवत मानले. सगुण व निर्गुण भक्ती ज्ञानेश्वरांनी समाजात रुजवली. हरिपाठाच्या अभंगातून हरि भक्ती, वैराग्य, ज्ञान, गीतेचे ज्ञान देऊन समाजाचे प्रबोधन केले. मध्ययुगीन काळात महाराष्ट्रात अनेक संतांनी अस्पृश्यता, भेदभाव, उच्चनीचता यावर आपल्या अभंगातून भाष्य केले आहे. त्यांनी देव, धर्म, वर्ण, अंधःश्रध्दा, विषमता, याबद्दल विचार मांडला आहे. संत ज्ञानेश्वर आपल्या ओवीत म्हणतात...

देव ते कल्पित शास्त्रे ती शाब्दिक
पुराणे सकळीक बाष्कळित ।
पाषाणाचा देव बोलेचिन कधी
हरीभवा न्याधी केली ही ।।

संत ज्ञानेश्वरांच्या कार्यानंतर महाराष्ट्र व महाराष्ट्राबाहेर जाऊन संत नामदेवांनी समाज घडविण्याचे काम केले. संत ज्ञानेश्वर आणि संत नामदेव हे दोघे समकालिन संत होत. संत नामदेवांचा जन्म शके ११९८ साली झाला. नामदेवांचे मन संसारात रमले नाही. त्यांचे मन विठ्ठल भक्ती मध्ये रमत होते. संत नामदेवांनी आपल्या भोवतीचे समाज जीवन पाहिले होते, त्यामुळे समाजातील अज्ञानी लोकांना या गर्तेतून बाहेर काढण्यासाठी विठ्ठल भक्तीला वाहून घेतले. संतांनी **"विठ्ठल"** हे दैवत भक्तीचे व लोकप्रबोधनाचे माध्यम मानले. संत ज्ञानेश्वरांनी स्थापन केलेल्या **वारकरी संप्रदायाची** धुरा त्यांनी पुढे समर्थपणे पेलली. नामदेवांना संत विसोबा खेचर गुरू म्हणून लाभले. संत नामदेव आपल्या अभंगाच्या माध्यमातून समाजाला बोध करतात. नामदेवांचे आज २५०० अभंग उपलब्ध आहेत. या शिवाय संत नामदेवांचे बाळक्रिडेचे अभंग, आरत्या, व भुपाळी अश्या रचना आढळतात. संत नामदेवांना ८० वर्षाचे आयुष्य लाभले. अशा या संत नामदेवांनी वारकरी संप्रदाय वाढविण्याचे कार्य केले. पंजाबमध्ये सामाजिक कार्य करण्यासाठी संत नामदेव ३० वर्ष राहीले आणि शेवटी पंढरपूरला येऊन, विठ्ठलाच्या चरणी त्यांनी समाधी घेतली.

संत चोखामेळा आपल्या अभंगात म्हणतात...

"हिन याती माझी देवा, कैशी घडावी तुझी सेवा ।
जोहार मायबाप जोहार, मी संता घराचा महार"
।।

तसेच

"उस डोंगा परि रस नोहे डोंगा काय भूललासी
वरलिया अंगा" ॥

संत चोखामेळा हे अस्पृश्य जातीतीत असल्याने त्यांना समाजात मानाचे स्थान नव्हते. हे त्यांच्या मुलगा कर्ममेळा, तसेच पत्नी सोयराबाई, मुलगी निर्मळा व मेहुणा बंका यांच्या अभंगातून दिसून येते. कर्ममेळा म्हणतात.

आमुचि केली हीन याती । तुज का न कळे श्रीपती ।
जन्म गेला उष्टे खाता । लाज न ये तुमच्या चित्ता ।।

संत सोयराबाई आपल्या अभंगात म्हणतात.

"देहिचा विटाळ देहिच जन्मला । सोवळा तो
झाला कवणा धर्म ?।।
विटाळा वाचोनी उत्पत्तीचे स्थान । कोण देह
निर्मळ नाही झाला ।।

अशा प्रकारे अस्पृश्य समाजाच्या वाट्याला आलेले दुःख संत चोखोबा आपल्या अभंगातून मांडतात. आपल्यावर झालेल्या अन्यायाची तक्रार परमेश्वराकडे मांडणारा पहिला अस्पृश्य समाजातील संत म्हणजे चोखोबा आहेत. संत चोखोबांचे एकूण ३४९ अभंग उपलब्ध आहेत.

संत तुकारामांनी आपल्या अभंगातून समाजाला नवी दिशा दिली. ते म्हणतात....

१. "वेदांचा तो अर्थ आम्हासीच ठावा ॥ येरांनी वाहावा भार माथी ।।
२. " मऊ मेणाहूनि आम्ही विष्णुदास । कठीण वज्रास भेदू ऐसे ।।

सर्व संतांच्या मध्ये श्रेष्ठत्वात्चा मान हा गोरोबा कुंभार यांना मिळतो. त्यांचे एकूण २० अभंग उपलब्ध आहेत. आपल्या व्यवसायातच त्यांनी देव शोधला. अशा प्रकार भक्ती करणारे संत या वारकरी संप्रदायात सापडतात. घरदार सोडून संन्यासी किंवा ब्रह्मचारी होऊन परमेश्वर भक्ती न करता संसारात राहून आपल्या जाती प्रमाणे व्यवसाय करता करता भजन व नामस्मरणरूपी भक्ती करूनही परमार्थ साधता

येतो हे या संतांनी समाजाला दाखवून दिले. या मध्ये गोरोबा कुंभार, सावता माळी, नरहरी सोनार, संत नामदेव, संत कान्होपात्रा इ. संतांचा उल्लेख करता येईल.

उदा. संत नरहरी सोनार म्हणतात .....

"देवा तुझा मी सोनार । तुझे नामाचा व्यवहार ।।
देह बागेसरी जाणे । अंतरात्मा जाण सोने ।।

या संतांनी आपल्या व्यवसायातच परमेश्वराचे रूप पाहिले. अठरा पगड जाती जमातींसाठी आपल्या अभंगातून समाज घडवण्याचे काम या संतांनी केले.

स्त्री संतांमध्ये मुक्ताबाई, जनाबाई, कोन्होपात्रा इ. चे काम मोठे आहे. संत मुक्ताबाईंनी ***"ताटीचे अभंग"*** संत ज्ञानेश्वरांसाठी लिहीले. तसेच संत जनाबाईंनी आपल्या अभंगातून समस्त स्त्री जीवनाच्या वाट्याला आलेले दुःख आपल्या अभंगातून मांडले आहे. संत कान्होपात्रा एका गणिकेचे जीवन त्या काळात कसे होते ते आपल्या अभंगांमधून मांडतात. महाराष्ट्राला पुरोगामीत्त्वाकडे घेऊन जाणाऱ्या तुकारामांच्याच कालखंडात समर्थ रामदास स्वामी यांचेही लेखन चालू होते. समर्थ रामदासांनी करुणाष्टके, एकवीस समासी, मनाचे श्लोक, दासबोध, भूपाळया, आरत्या, अशी वैशिष्ट्यपूर्ण रचना केली. समर्थ रामदासांचे विचार आणि त्याचे वाङ्मय समाजासाठी आज ही दिशा देणारे आणि प्रेरणादायी आहे.

समर्थ रामदास म्हणतात-

आधी प्रपंच करावा नेटका ।
मग घ्यावे परमार्थ विवेका ।।

**समारोप**

महाराष्ट्रातील संतांचे सामाजिक योगदान हे कालातीत आहे. त्यांनी आपल्या अभंगातून मानवतावादी दृष्टीकोन मांडला. त्यांनी अभंगातून समाजाला नैतिकता, समानता आणि अध्यामिकतेचा मार्ग दाखवला. आजही या संतांचे साहित्य समाजाला मार्गदर्शन करणारे आणि प्रेरणा देणारे आहे.महाराष्ट्रातील संतांनी निरक्षर समाजाला एक नवी दिशा दिली. ती दिशा होती अध्यात्माची. अध्यात्माच्या माध्यमातून समानता, सदाचार, नीती, समाजात रुजवली. परमेश्वर आणि संतांवरील श्रध्दा रुजवली. संतांनी विषमता अमान्य करून सामाजिक व पारमार्थिक संदर्भात समाजातील सर्व थरातील लोकांना न्याय देण्यास प्रयल केला. त्यामुळे विविध जाती जमातीतील लोक या संप्रदायाच्या छत्राखाली एकत्र झाले. त्यांनी आपले व्यवसाय, आर्थिक व्यवहार, त्याच्या जीवनातील सुख-दुःख, त्यांचे विचार, आपल्या अभंग व इतर साहित्यातून समाजापुढे मांडले आहेत.

**संदर्भ सूची**


1. "प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास" , ल. रा. नसिराबादकर, फडके प्रकाशन, कोल्हापूर, आवृत्ती ऑगस्ट २००६, जुलै २००८.
2. "संत पंत व तंत", श्री. म. माटे, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, व्दितीयावृत्ती नोव्हें. २००६
3. "साहित्याचे सामाजिक व सांस्कृतिक अनुबंध", म. सु. पाटील, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, पुनर्मुद्रण, जानेवारी २०२०
4. "अभंगांची गाथा", श्री संत तुकाराम महाराज संस्थान, पुणे, पुनरावृत्ती. २३ नोव्हेंबर २००८
5. "संत, समाज आणि अध्यात्म", गं. बा. सरदार यांचे मत. (संपा.) वि. शं. चौगुले, मधुरा प्रकाशन, ठाणे. २००६
6. "संत वाङमयाची सामाजिक फलश्रुती : एक ओळख", गं. बा. सरदार, श्रीविद्या प्रकाशन, पुणे. १९८२
7. "पाच भक्तिसंप्रदाय", र. रा. गोसावी, प्रतिमा प्रकाशन, पुणे. १५ ऑगस्ट २००८.